**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९१६ दि. ०६/०९/२०१९**

## चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे
## सार्वजनिक गणपती मंडळांच्या अध्यक्ष / पदाधिकारी यांना विसर्जनाबाबत मार्गदर्शन केले.

दि. ३१/०८/२०१९ रोजी चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनचे हॉलमध्ये श्रीमती. वैशाली गलांडे, पोलीस निरीक्षक, गुन्हे यांनी १८.३० ते १९.०० वा. दरम्यान कम्युनिटी पोलीसींग अंतर्गत मुख्य मिरवणुकीत सामील होणा-या सार्वजनिक मंडहांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस २० मंडळांचे ५२ कार्यकर्ते हजर होते. सदर बैठकीतध्ये मंडळांचे अध्यक्ष व पदाधिकारी यांना जो ऑनलाईन परवाना आहे त्याचे अटी व नियमांचे पालन करण्याबाबत तसेच डीजे न लावता मिरवणुक काढण्याबाबत ज्या मंडळांचे वाहन चालक मिरवणुकी दरम्यान वाहन सोडुन जातील त्यांना पुढील वर्षी परवाना दिला जाणार नाही. तसेच मिरवणुकीमध्ये सामील होणा-या मंडळांच्या कार्यकर्त्यांनी दारु चे सेवन न करण्याबाबत सुचना दिल्या. कुमठेकर रोड, केळकर रोड, ने जाणा-या मंडळांना लवकर जायचे असल्यास त्यांना पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देण्यात येईल. परंतु लक्ष्मी रोडने जाणा-या मंडळांना जो नंबर असेल त्याच नंबरने जावे लागेल याबाबतच्यासुचना दिल्या.

